# यशस्वी भाजीपाला लागवडीचे कानमंत्र

श्री. विशाल यादव
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या)
डॉ. सुरेश जगदाळे
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
माफसू, नागपूर सलग्न, कृषी विज्ञान केंद्र, नागांव, ता. मुरबाड, जि. ठाणे

## यशस्वी भाजीपाला लागवडीचे महत्व:

भारतात ६२ लाख हेक्टर क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर भाजीपाला पिके घेतली जातात, त्यापासून दरवर्षी अंदाजे ७१५ लाख टनांच्या वर भाजीपाला उत्पादन मिळते. देशातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता तसेच आहारतज्ञांनी समतोल आहाराच्या दृष्टीने दर माणसी दर दिवशी आहारात ३०० ग्रॅम भाजी खाण्याची केलेली शिफारस लक्षात घेता सध्याच्या भाजीपाला उत्पादनातून दर माणशी दर दिवशी फक्त २१० ग्रॅमच भाजी उपलब्ध होत आहे. त्यासाठी सध्याचे भाजीपाला उत्पादन तीस टक्यानी वाढविण्यास वाव आहे. तसेच लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यानुसार भाजीपाला उत्पादनाची गरज ही वाढतच राहणार आहे. भाजीपाला पिकाच्या लागवडीच्या विविध बाबींचा सखोल अभ्यास करुन मशागतीच्या योग्य तंत्राचा तसेच साधनाचा वापर करुन ठरावीक क्षेत्रातून विविध भाजीपाला पिकाची उत्पादकता कशी वाढविता येईल यासाठी यशस्वी भाजीपाला लागवडीचे तत्वे माहित असणे आवश्यक आहे.



## १. जागेची निवड:

भाजीपाल्याची पिके नाशवंत असल्यामुळे काढणीनंतर लगेच बाजारात पोहोचविता येतील. अशा वाहतुकीची सोय असलेलया ठिकाणीच भाजीपाल्याच्या लागवडीसाठी जागेची निवड करावी. मोठया शहराच्या आसपास भाजीपाल्याची शेती पिकविणे अधिक फायदेशीर ठरते. कारण शहरातील मालाची आवक मागणी व त्याप्रमाणे उत्पादन ठरविता येते. महाराष्ट्रात आता मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद यासारख्या मोठया शहराखेरीज बहुतेक जिल्हयातून औद्योगिक वसाहती वाढत आहेत. त्यामुळे भाजीपाल्याचा खप व मागणी वाढत आहे अशा ठिकाणी भाजीपाल्याची लागवड निश्चितच फायदेशीर होऊ शकेल.

पिकविलेला भाजीपाला लवकरात लवकर उत्तम स्थितीत बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी चांगले रस्ते व वाहतुकीची उत्तम व जलद सोय असणे जरुरीचे आहे. लांबच्या बाजारपेठेत माल पाठविण्याच्या दृष्टीने जवळपास सोईस्कर रेल्वेस्टेशन, पक्का रस्ता, हवाईमार्ग असणे फारच आवश्यक आहे. भाजीपाल्याच्या पिकांना वर्षभर सतत पाण्याचा पुरवठा करावा लागत असल्यामुळे ज्याठिकाणी तळे, विहिर इत्यादी बारमाही पाणी पुरविण्याची नियमित व हमखास पाण्याची साधने असतील अशीच जागा भाजीपाल्याच्या लागवडीस निवडावी.

## २. हवामान:

यशस्वी भाजीपाला उत्पादनामध्ये हवामान हा फार महत्वाचा घटक आहे. हवामान हा असा घटक आहे की जो शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेरचा आहे. हवामानात कमाल आणि किमान तापमान आणि त्या तापमानाची कालमर्यादा, सुर्यप्रकाश, त्याची मर्यादा, तीव्रता आणि कालमर्यादा, वर्षातील सरसरी पाऊसमान, पावसाचा काळ आणि विभागणी, हवेतील आर्द्रता इत्यादी गोष्टीचा समावेश होतो. या सर्व गोष्टींचा विचार करुनच त्या ठिकाणी भाजीपाल्याची कोणती पिके घ्यायची ते ठरविले पाहिजे. महाराष्ट्रात हवामान बहुतांशी उष्ण आणि समशितोष्ण आहे. त्यामुळे फार कडाक्याची थंडी किंवा असहय उन्हाळा नसतो. पर्जन्यमान आणि तापमान या गोष्टीचा विचार केल्यास वर्षाची विभागणी खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तीन हंगामात करता येईल.

समुद्रकिनारपट्टी आणि त्यालगतच्या डोंगराळ भागात पर्जन्यमान २५०० मि.मी. पेक्षा जास्त आहे आणि हवेतील आर्द्रता जास्त आढळते अशा ठिकाणी खरीप हंगामात चवळी, काकडीवर्गीय भाजीपाला आणि काही पालेभाज्या घेता येतील यात हिवाळी आणि उन्हाळी हंगामासाठी कोबीवर्गीय भाज्या, वाटाणा या भाज्यासाठी हमखास पाण्याची सोय असल्यास इतर बहुतेक भाज्याची लागवड करता येते. ज्या ठिकाणी सरासरी पर्जन्यमान ६२५ ते १२५० मि.मी. असते व पाऊस विभागून पडतो. त्याठिकाणी खरीपात मिरची, चवळी, गवार, भेंडी आणि काकडीवर्गातील भाजीपाला घेता येईल. हिवाळी हंगामात वांगी, टोमॅटो, मेथी, पालक आणि उन्हाळी हंगामात भेंडी, काकडी, दुधीभोपळा, कारली वगैरे भाज्या यशस्वीरित्या घेता येतील. महाराष्ट्राच्या दख्खन पठारावर पाऊस ६२५ मि.मी. पेक्षा कमी आहे आणि हवामान कोरडे आहे आणि उन्हाळयातील तापमान ४० सें.ग्रेच्या जवळपास असते आणि हिवाळयात तापमान ४ ते ५ से.ग्रे.पर्यंत खाली येते अशा ठिकाणी पाण्याची सोय असल्यास वर्षभर बहुतेक सर्वप्रकारचा भाजीपाला लावता येतो.

### ३. जमीन:

क्षारयुक्त व पाणथळ जमीन सोडून बहुतेक सर्व प्रकारच्या जमिनीत भाजीपाला पिके घेता येतात. वांगी, मिरची, टोमॅटो यांची मुळे जमिनीत खोलवर जातात. त्यामुळे त्याच्या लागवडीसाठी कमीतकमी ६० सें.मी. खोलीची जमीन निवडावी.

भाजीपाला हंगामी असल्यामुळे जमीन वर्षभर पिकाखाली राहते. म्हणून सुपीक, सेंद्रीय पदार्थयुक्त व उत्तम निच-याची कसदार जमीन भाजीपाला लागवडीसाठी निवडावी. उशीरा पक्व होणा-या पिकांसाठी मध्यम पोत असणा-या जमिनी निवडाव्यात. चिकणमातीयुक्त जमिनीत हवा खेळती राहत नाही. हलक्या हमिनीत अन्नद्रव्ये व ओलावा कमी राहतो. त्यासाठी भरखतांव्दारे अन्नद्रव्यात वाढ केली जाते. ज्या भाजीपाला पिकांचा खाण्यायोग्य भाग जमिनीखाली वाढतो. उदा. कांदा, लसून, मुळा, गाजर, बटाटा इ. पिकांसाठी हलकी ते मध्यम भुसभुशीत जमीन उत्तम समजली जाते. भाजीपाला पिकांची लागवड जमिनीच्या सामुनुसार करावी असे केल्यास भाजीपाल्याचे उत्पादन जास्त मिळू शकते.

### ४. ओलीताची सोय:

भाजीपाल्याची यशस्वी लागवडीसाठी ओलीताची हमखास सोय असणे आवश्यक बाब आहे. पाण्याशिवाय भाजीपाल्याची लागवड जवळ जवळ अशक्य आहे. हमखास पाऊस पडणाऱ्या भागातच मिरची, गवार, चवळी, भेंडी, टोमॅटो, वांगी यासरख्या भाजीपाला काही ठिकाणी निव्वळ पावसाच्या पाण्यावर घेण्यात येत असला तरी व्यापारी तत्वावर भाजीपाल्याची लागवड करायची झाल्यास पाण्याचा हमखास आणि सतत पुरवठा आवश्यक आहे. कारण भाजीपाल्याची पिके लवकर वाढणारी आणि झटकन तयार होणारी असल्यामुळे पाण्याचा थोडा जरी ताण पडला तरी उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो. विशेषत: फुले येताना आणि फळांच्या वाढीच्या काळात पाणी कमी पडल्यास उत्पादनात मोठी घट येते आणि काही वेळा संपूर्ण पीक हातातून जाते. म्हणून पाट, नदी, तलाव किंवा विहिरीचे पाणी आवश्यक आहे. विहीर बागाईत असल्यास पाणी सतत पुरेल अशी सोय पाहिजे किंवा पाण्याच्या उपलब्धतेप्रमाणे भाजीपाल्याची पिके घ्यावीत. तसेच पाणी पिकाला योग्य आहे किंवा नाही हे तपासून घेतले पाहीजे. पाण्यात १५०० पी.पी.एम पेक्षा जास्त क्षार असू नयेत.

### ५. सुधारीत जाती:

भाजीपाल्याचे शुध्द आणि जातिवंत बी वापरणे उत्पन्नाच्या दृष्टीने फारच महत्वाचे आहे. कारण थोडया काळात अधिक फायदा मिळवून देणारी नगदी पिके म्हणून भाजीपाला पिकाकडे पाहिले जाते. भाजीपाला पिकाच्या एकूण उत्पादन प्रक्रिया मध्ये बियाण्यांचा सर्वसाधारणपणे ३० टक्के वाटा असतो. याचा अर्थ असा की केवळ रोग प्रतिबंधक जातीचे बियाणे वारल्यामुळे काहीवेळा ७० ते ८० टक्के नुकसान टाळता येते.

### ६. बियाणे/रोपे तयार करणे:

वनस्पतीच्या जीवनक्रमात बियांना महत्वाचे स्थान आहे. भाजीपाला पिकांना तर अधिक महत्व आहे. कारण थोडया काळात अधिक फायदा मिळवून देणारी नगदी पिके म्हणून या पिकांकडे पाहिले जातेः सुधारीत जातीचे व चांगलया प्रकारे तयार केलेल्या बियाण्यामुळे जास्त फायदा झाल्याचे दिसून येते. उदा. भेंडीचे केवडा रोगप्रतीबंधक जाती मिरचीच्या भूरी व फळकुजव्या रोगप्रतिबंधक जाती वारल्यास उत्पादनात वाढ होते. वेगवेगळया भाज्यात अनेक उत्तम जाती विकसीत करण्यात आल्या आहेत.

स्थानिक जातींचा वापर केल्याने केवळ उत्पादनातच घट येत नाही. तर त्यातील अनेक जाती रोगास व किडीस चटकन बळी पडणा-या असल्याने नुकसान अधिक वाढते. अशा परिस्थितीत बियाण्याचे महत्व ओळखून चांगल्या जातीचे व शुध्द बियाणे मिळवणे आवश्यक असते.

### रोपे तयार करणे:

भाजीपाल्याच्या पिकापैकी घेवडा, दुधी भोपळा इत्यादीचे बी कायम जागी लावून लागवड करतात. पण टोमॅटो वांगी, मिरची, कोबी, फ्लॉवर, कांदा या पिकांची रोपे वाफ्यात तयार करुन त्यांची योग्य काळजी घेणे व नंतर कायम जागी लावण्याचे एक खास तंत्र आहे. त्यावर भाजीपाला लागवडीचे यश अवलंबून आहे.





### रोपवाटीकेत रोपे तयार केल्यास पुढील फायदे आहेत:

१. रोपांची रोपवाटीकेत स्वतंत्रपणे चांगली निगा ठेवता येते.
२. कोवळया रोपांच्या वाढीस अत्यंत पोषक अशा सर्व गोष्टी उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे.
३. रोग व किडींचा वेळीच बंदोबस्त करता येतो.
४. सुरक्षित जागी रोपे लावलेली असल्याने पिकांची लागवड लवकर करणे शक्य होते.
५. जागेची व बियांची बचत होते. शेताच्या मशागतीस पुरेसा वेळ मिळतो.

१ हेक्टर लागवडीसाठी साधारणत: १५ ते २० आर क्षेत्रावर गादीवाफे तयार करावेत. गादीवाफे १ मी. रुंदीचे व लांबी जमिनीच्या उतारानुसार ठेवून गादीची उंची १५-२० सेंमी. ठेवावी. गादीवाफ्यावर चांगले कुजलेल्या शेणखताचा पातळ थर दयावा. ते मातीत चांगले मिसळून घ्यावे. त्यामध्ये फॉलीडॉल पावडर मिसळावी आणि गादीवाफयाचा पृष्ठभाग एकसारखा करुन दयावा. गादीवाफयावर बी ओळीत पातळ पेरावे व मातीने झाकुन टाकावे. बी उगवून येईपर्यंत झारीने पाणी दयावे नंतर पाटाने पाणी दयावे. दोन ओळीत कांकरीपाडून प्रती वाफयास २५-३० ग्रॅम फौरेट दयावे.

फुलकिडी व करपा रोगापासून संरक्षणासाठी १० लि. पाण्यात १०-१५ मिली. मेटॅस्टीस्टॉक किंवा मॅलेथिऑन आणि २५ ग्रॅम डायथेन एम ४५ मिसळून बी उगवून आल्यानंतर १५ दिवसांनी फवारावे. वरचेवर तण काढून वाफे स्वच्छ ठेवावेत व नियमित पाणी दयावे. बी पेरल्यानंतर साधारणतः ४ ते ८ आठवडयात भाजीपाल्याची रोपे लागवडीस तयार होतात.

### ७. पाणी पुरवठा:

भाजीपाला पिकांना इतर पिकांपेक्षा जास्त पाण्याची आवश्यकता असते. भाजीपाल्याच्या झाडांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते. तसेच बाष्पीभवनामुळे पाण्याची सतत वाफ होत असते. एका वर्षात एका शेतात २-३ भाजीपाल्याची पिके घेता येतात. त्यामुळे भाजीपाला पिकांना ओलीताचे फार महत्व आहे. विशेषता बी उगवताना पिकाची वाढ होताना व फळधारणा होत असताना पाण्याचा तुटवडा होऊ देता कामा नये. अशावेळी नियमीत पाण्यचा पुरवठा करावा. पाण्याचे प्रमाण हे दोन पाण्यामधील अंतर, भाजीपाल्याचा प्रकार, जमीन व हवामान या गोष्टींवर अवलंबून असते, उदा. गवार व चवळी मधील अंतर जास्त ठेवावे लागते. या उलट कोबी, फ्लॉवर, घेवडा या सारख्या उथळ मुळया असलेल्या पिकां पाण्याचे प्रमाण कमी लागते. व दोन पाण्यामधील अंतर कमी ठेवावे. सर्वसाधारणपणे भाजीपाला पिकांना वरवर धावते पाणी देण्यापेक्षा एकाचवेळी ३० सेंमी पर्यंत जमीन भिजेल एवढे पाणी देणे आवश्यक असते. उन्हाळयात कोरडी हवा व अधिक तापमानामुळे बाष्पीभवन वाढते. त्यामुळे पिकांना जास्त प्रमाणात लवकर पाणी दयावे लागते. वांगी, टोमॅटो, भेंडी, मिरची या पिकांना ठिबक पध्दतीने पाणी दयावे. तर कांदा, लसून, पालेभाज्यांना सुक्ष्म तुषार पध्दतीने पाणी दयावे.

### ८. खते:

वनस्पतीच्या वाढीसाठी अन्नद्रव्याची जरुरी असते. ही द्रव्ये जमिनीतुन मुळांव्दारे शोषली जातात. वनस्पतीत आवश्यक असणा-या घटकापैकी एखादया द्रव्याची कमतरता झाली किंवा त्याचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त झाले तर वनस्पतीच्या वाढीवर प्रतीकूल परिणाम होतो व कित्येक वेळा निरनिराळया विकृती उद्भवतात. ही सर्व द्रव्ये प्रमुख्याने जमिनीतून घेतली जातात. म्हणून जमीन सुपीक ठेवली पाहिजे. भाजीपाला पिकांच्या वाढीसाठी व फळधारणेसाठी सेंद्रीय व रासायनिक खते आवश्यक आहेत. सेंद्रीय खतात शेणखत, लेंडीखत, कंपोष्ट खत हे नेहमीच्या वापरातील खते आहेत.

जमिनीत वनस्पतींना पोषक अन्नद्रव्ये मोठया प्रमाणात असले तरी पिकांना सर्वच्या सर्व उपयोगात आणता येईलच असे नाही. भाजीपाला पिकांना शिफारसीनुसार रासायनिक खते व सुक्ष्मअन्नद्रव्ये वेळच्यावेळी दिल्यास उत्पादनात मोठया प्रमाणावर फायदा होतो. भाजीपाला पिकांना नत्रयुक्त खेत देताना २-३ हप्त्यात विभागून दयावीत. खते रोपांच्या बुंध्याजवळ न टाकता थोडी लांब किंवा दोन ओळीत टाकून ती मातीने झाकावीत. ती उघडी पडल्यास त्यातील नत्र अमोनियाच्या स्वरुपात उडून जातो व पिकास त्याचा उपयोग होत नाही. खते दिल्याबरोबर पाणी देणे आवश्यक आहे त्यामुळे ती पिकांना लवकर उपलब्ध होतात.

### ९. आंतरमशागत:

पिकांची वेळीच खुरपणी करुन तण काढून टाकल्यास पिकांची वाढ जोमाने होते. तणाने जमिनीवर डोके काढल्याबरोबर ते काढून टाकावे. हा तणांच्या बदोबस्तावर सर्वोत्तम उपाय आहे पिकातील तण एकदा काढून भागत नाही. ते २ ते ३ वेळा काढावे. तण काढण्याखेरीज पिकाला भर देणे जमीन हलवून मोकळी करणे टोमॅटो सारख्या पिकास बाबुंचा आधार देणे ही आंतरमशागतीची कामे करावीत. तणांचा बंदोबस्त करण्यासाठी रासायनिक तणनाशकांचा वापर फार उपयोगी आहे. विशेषता जिथे मजुरांचा तुटवडा आहे अशा ठिकाणी तणनाशकांचा उपयोग करावा. उदा. बासालीन, गोल, लॅसो, स्टॉम्प, सेन्कोर तणांच्या बंदोबस्तासाठी आच्छादनाचा वापर करावा. पिकातील तण काढल्यानंतर दोन ओळीत मोकळया जागेत वाळलेला पाला किंवा गवत वाळलेली पाने किंवा काळया पॉलिथीनने झाकून टाकतात. त्यामुळे तणांचा बंदोबस्त होतो. पाण्याची बचत होते.

### १०. किड रोगाचा बंदोबस्त:

भाजीपाल्याच्या पिकांवर अनेक रोग व किडींपासून उपद्रव होतो. रोगराई व किडीमुळे साधरणता पिकांचे २५-३० टक्के नुकसान होते. भाजीपाल्याच्या यशस्वी लागवडीसाठी त्याचे वेळीच नियंत्रण करणे फारच महत्वाचे आहे. किंबहुना मुळातच त्याचा उपद्रव होवू नये अशी खबरदारी घेणे जास्त उपयुक्त ठरेल. भाजीपाला पिकांवर कितीतरी किडी दिसून येतात. भाजीपाल्यावर मावा, तुडतुडे, फळमाशी, भुंगेरे, खरडया व माईटस या किडींपासून विशेष उपद्रव होतो. किडीच्या बंदोबस्तासाठी पिकावरील अळया हाताने वेचून नष्ट करणे मशागतीच्या सुधारीत पध्दतीचा अवलंब करणे पिकांची फेरपालट लवकर किंवा उशीरा लागवड करुन किडी व रोगांचा उपद्रव टाळणे तसेच किड व रोग प्रतिबंधक उपाययोजना करणे. किटकनाशक व बुरशीनाशकांचा वापर करुन किडींचा व रोगांचा नायनाट करणे. किडीप्रमाणेच रोगामुळे ही कित्येकवेळा भाजीपाल्याचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. भाजीपाल्यावरील रोग निरनिराळया प्रकारच्या बुरशी, जीवाणू, विषाणू, सुक्ष्मकृमी, मायक्रोप्लाइ मा आणि वनस्पतिच्या शारिरीक क्रियेतील विषाणू इत्यादी कारणामुळे होतात. भाजीपाल्याच्या रोगावरील नियमातील अत्यंत महत्वाची बाब म्हणजे रोगाची सुरुवात होण्याआधी प्रतिबंधक उपाययोजने कारण रोगग्रस्त झाड औषधाने पुर्ववत संपूर्ण निरोगी होऊ शकत नाही म्हणून रोग होण्या अधिच किंवा थोडीशी लक्षणे दिसल्याबरोबर तातडीने औषधोपचार करणे जरुरीचे आहे. उत्तम रोगप्रतिकारक जाती वापरणे हे एक खात्रीलायक उपाय आहे.

उदा. भेंडीची परभणी क्रांती ही जात केवडा या रोगास प्रतिकारक आहे. भाजीपाल्याच्या बागेत किड आणि रोड आल्यास उपाययोजना करण्यापेक्षा रोग आणि किड येऊ न देणे आणि त्याकरीता खबरदारी घेणे हेच यशस्वी लागवडीचे रहस्य आहे.



११. भाजीपाला काढणी प्रतवारी विक्री:

बहुतेक भाजीपाला कोवळा असतानाच काढावा लागतो. वाटाणा, घेवडा, मुळा, गाजर, काकडी इत्यादी भाज्याची वाढ पूर्ण होण्याआधी त्या कोवळया लुसलुसीत असतात. आणि त्यांचा स्वाद व गुणवत्ता उत्कृष्ट असते. वाटाण्याच्या शेंगातील दोणे पुर्ण भरावयाच्या थोडेसे आधी अत्यंत गोड व स्वादिष्ट असतात. तर घेवडा व गवारीच्या शेंगा दाणे भरायला सुरुवात होण्याआधीच कोवळया व रेषाविरहित असतात. अशाच मालाची काढणी करावी. मुळा, गाजर, बीट इ. मुळभाज्या त्यांच्या पूर्ण आकाराच्या २/३ आकाराएवढी वाढ झाली असताना कोवळे व उत्कृष्ट असतात. लांबच्या बाजारपेठेसाठी टोमॅटोवर थोडीशी गुलाबी छटा दिसल्याबरोबर तोडणी करावी. कोवळी भेंडी मिळण्यासाठी भेंडीची तोडणी एक दिवसाआड करावी. बटाटा पुर्ण वाढून साल चांगली पक्व झाल्यावर काढणी करावी. कांदयाची काढणी कांदयाच्या ६०-७० टक्के माना मोडल्यानंतर करावी. असा कांदा काढून वरचा पापुद्रा हाताळताना सहज सुटेपर्यंत सुकून साठवून ठेवल्यास चांगल्या अवस्थेत रहातो. व जास्त दिवस टिकतो. कलिंगड, खरबुज व तांबडा भोपळा पुर्ण पक्व झाल्यावरच करावी. कोबीचा तयार गड्डा अंगठयाने दाबल्यास न दबता घट्ट वाटतो. फ्लॉवरचा पांढरा स्वच्छ घट्ट गड्डा तयार झाल्याबरोबर काढावा. तसाच राहू दिल्यास तो फुटून विरळ होतो किंवा त्याच्यावर तांदुळ पसरल्यासारखा खडबडीतपणा दिसू लागतो. यालाच राईसीनेस असे म्हणतात. पालेभाज्यांची काढणी त्याची पाने पुर्ण वाढलेली पण कोवळी आणि लुसलुसीत असताना आणि फुलावर येण्याआधी करावी. मुळा, गाजर, भेंडी, घेवडा व पालेभाज्याची काढणी शक्यता. सकाळी किंवा ढगाळ वातावरणात करावी.

भाजीपाल्याची काढणी केल्यानंतर त्याची वाहतूक निवारा शेडमध्ये करावी. पॅकींग शेडमध्ये आणलेल्या भाज्यांची प्रतवारी करणे अत्यंत महत्वाचे आहे. किडलेल्या, नासलेल्या, खरचटलेल्या, दबलेल्या, फुटलेल्या भाज्या चांगल्या भाज्यापासून बाजूला कराव्यात. आकारमानाने वेड्यावाकड्या असलेल्या भाज्या वेगळया कराव्यात. त्यानंतर चांगल्या भाज्यामधून आकारमान, रंग, वजन, जाती, आकर्षकपणा इत्यादी बाबीवरुन भाज्याची प्रतवारी करावी. प्रथम दर्जाच्या मोठा आकाराच्या आकर्षक आणि ग्राहकाची पसंती लक्षात घेऊन भाज्या मोठया आणि दुरच्या बाजारपेठेसाठी पाठवाव्यात. दुय्यम दर्जाचा भाजीपाला इतर आणि स्थानिक बाजापेठेसाठी पाठवावा. तर ज्या भाज्याची नासाडी व्हायला सुरुवात झाली आहे अशा भाज्या प्रक्रियेसाठी वापराव्यात. अशा पध्दतीने भाज्याची प्रतवारी करावी. कंदवर्गीय भाज्या पालेभाज्या काढणीनंतर पाण्याने स्वच्छ धुवून घ्याव्यात नंतर पालेभाज्याच्या जुडया बांधाव्यात.

भाजीपाल्याच्या काढणीनंतरच्या व्यवस्थापनात त्यांच्या पॅकींगला अतिशय महत्व आहे. प्रतवारी नंतर वांगी, टोमॅटो, बटाटा, ढोबळी मिरची, भेंडी, कारली अर्धा ते एक किलो प्लॅस्टीकच्या पिशव्यामधून पॅक करुन मुंबई, चेन्नई, दिल्ली आणि कोलकत्ता येथील बाजारपेठातून विकल्या जातात. पालेभाज्यांच्या जुडया करुन त्या सुतळीने बांधून जुडयांचा मोठा गठ्ठा करुन तो वाहतुकीच्या साधनामध्ये जसाच्या तसा भरतात. कांदे, बटाटे, मिरचीसाठी हलक्या प्रतीची पाती पॅकींगसाठी वापरावीत.

टोमॅटो स्थानिक बाजारासाठी ट्रक किंवा टेंपोमध्ये पॅकींग शिवाय पाठवावा परंतू लांब मार्केटला टोमॅटो पाठवायचा असेल तर लाकडी खोकयामधून किंवा प्लास्टीक क्रेटस मध्ये पाठवावा भाजीपाला पॅकींगसाठी पोती, लाकडी खोकी, बांबूपासून आणि ज्युटच्या बनविलेल्या टोपल्या तसेच कोरोगेटेडच्या पेटया आणि प्लॅस्टिकच्या पिशव्याचा वापर करावा.

भाजीपाल्याची किफायतशीर विक्री करणे हा उत्पादनाचा फारच महतवाचा भाग आहे. अनेक अडचणीना आणि धोक्यांना तोंड देऊन भाजीपाला उत्पादन केल्यावर त्याची योग्य भावाने विक्री झाली नाहीतर मोठे आर्थिक नुकसान आणि तोटा होण्याचा संभव असतो भाजीपाला हा नाशवंत माल असल्यामुळे तयार झाल्याबरोबर काढून लवकरात लवकर त्याची विल्हेवाट लावली पाहिजे पालेभाज्या काढल्यानंतर काही तासाच्या आतच गि-हाईका पर्यंत पोहचल्या पाहिजेत नाहीतर शेतक-याच्या हाती काहीच लागत नाही. भाजीपाल्याचे उत्पादन करणे शेतक-याच्या हातात असते. त्यामुळे उत्तम प्रतीचा माल पिकवूनही तो योग्य दरात विकला जाऊन हाती चांगला पैसा येईल याची शेवटपर्यंत खात्री नसते. म्हणून शेतक-यांनी या बाबतीत सतत जागरुक राहून निरनिराळया बाजापेठातून कोणत्या भाजीपाल्याची मागणी जास्त असते. मालाचा तुटवडा केव्हा असतो इतयादी माहिती मिळवली पाहिजे आणि त्यानुसार मालाचे उत्पादन आखून विक्रीची व्यवस्था केली पाहिजे.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★